29 MAR 2019

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# तुकारामांच्या अभंगांचे अनन्यसाधारण महत्त्व

## प्राचार्य डॉ. दिलीप धोंडगे यांचे प्रतिपादन - संत तुकाराम व्याख्यानमाला, शिवाजी विद्यापीठातर्फे आयोजन

प्रतिनिधी
कोल्हापूर

संत तुकाराम महाराजांचे अभंग, पारायणे, हरिनाम मानवी समाजासाठी उपयुक्त होते. मानवी जिवनामध्ये जे - जे उपयुक्त आहे ते समाजाला देण्याचे काम संत तुकारामांच्या अभंगांनी केले. समाजामध्ये प्रबोधन करण्याचे काम तुकाराम महाराजांच्या अभंगांनी केले असल्याचे प्रतिपादन प्राचार्य डॉ. दिलीप धोंडगे यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या संत तुकाराम अध्यासनाच्या वतीने संत तुकाराम महाराज व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवारी शाहू स्मारक भवन येथे 'तुका झालासे कळस' या विषयावर पुष्प गुंफताना प्राचार्य डॉ. दिलीप धोंडगे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे होते. कार्यक्रमाची सुरूवात संत तुकाराम महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यावेळी डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. रणधीर शिंदे आदि उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ. दिलीप धोंडगे म्हणाले, महाराष्ट्राच्या प्रत्येक खेड्यापाड्यामध्ये अभंग, हरिनाम सप्ताह, पारायण यांचे खूप मोठे महत्त्व आहे. महाराष्ट्र ही संतांची भूमि आहे. मानवी जीवनामध्ये प्रत्येक टप्प्यावर संतांची शिकवण आपणास उपयुक्त ठरत असते. नामस्मरणाचा अभिषेक महत्वाचा आहे. संतांची शिकवण जपून ठेवण्याचे मोठे काम महाराष्ट्रातील वारकऱ्यांनी केले आहे.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वतीने आयोजीत व्याख्यानमालेत बोलताना प्राचार्य डॉ. दिलीप धोंडगे, कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे आदि. (छाया इम्रान गवंडी)

संत तुकाराम महाराजांचे साहित्य, अभंग अत्यंत सोप्या व साध्या शब्दांत होते. यामुळे प्रत्येकाला ते आपलेसे वाटत होते. स्वातंत्र्यपूर्व काळात ईस्ट इंडिया कंपनी स्थापन झाल्यानंतर संत तुकोबांच्या अभंगांनी सर ॲलेक्झांडर ग्रँम प्रभावित झाले. यानंतर त्यांनी तुकाराम महाराजांच्या अभंगांचा अभ्यास करण्यास सुरूवात केली. १८३१ मध्ये सर ॲलेक्झांडर ग्रँम यांनी मुंबई विद्यापीठाच्या जर्नलमध्ये 'तुकाराम ईज नॅशनल पोएट' हा खंड प्रसिद्ध केला. यानंतर १८७१ मध्ये दुसरा खंड प्रसिद्ध केला. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी जेलमध्ये असतानाही तुकाराम महाराजांच्या अभंगांचा अभ्यास केला. रवींद्रनाथ टागोर, यांनीही तुकाराम महाराजांच्या गाथांचा अभ्यास केला आहे. तुकाराम महाराजांचे साहित्य सर्वसामान्य जनतेलाही आपलेसे वाटले. गुजरात, तमीळनाडू, केरळ येथेही तुकाराम महाराजांच्या साहित्याचा अभ्यास केला आहे. तुकाराम महाराजांचे साहित्य विलक्षण प्रतिभाशाली प्रत्येकाला आपलेसे वाटणारे, होते असे मतही प्राचार्य डॉ. दिलीप धोंडगे यांनी व्यक्त केले.

विज्ञान

डॉ. व्ही. एन. शिंदे

# वणवा आणि आपण





वणवा. उन्हाळा सुरु झाला की वणव्याच्या बातम्या यायला सुरुवात होते. उन्हाळा हा वणव्याचा ऋतू आहे की काय असे वाटायला लागते. वणवा म्हणजे जंगल, कुरण किंवा गवताळ प्रदेशात लागलेली अनियंत्रित आग. अशी आग एकदा लागली की तिच्यावर नियंत्रण मिळविणे खूप कठीण. अनेकदा अशा वणव्यात जंगल कित्येक महिनेही जळत राहते. वणवे लागण्याची कारणे जशी नैसर्गिक आहेत, तशीच ती मानवनिर्मितही आहेत. वणवे प्रामुख्याने मानवच लावतो, नैसर्गिक वणवे पेटण्याचे प्रमाण हे केवळ १५ टक्के इतके आहे. उर्वरित ८५ टक्के वणवे मानवनिर्मित आहेत.

वणव्याची काही नैसर्गिक कारणे आहेत. आकाशातून पडणारी वीज, उन्हाळ्यात वाढत्या तापमानामुळे कोरडी पाने आणि गवत पेटणे, मोठी झाडे पडताना घर्षणातून पडणाऱ्या ठिणग्या, गवत, पाने कुजताना मिथेनसारख्या ज्वालाग्राही वायूची निर्मिती आणि त्याने पेट घेणे ही पूर्णत: नैसर्गिक कारणे आहेत. जंगलातून जाणाऱ्या विद्युत तारांच्या पडणाऱ्या ठिणग्याही अनेकदा वणव्याचे कारण ठरतात. त्याखालील गवत काढणे आपल्या हाती असते. मात्र, अनेकदा त्याकडे दुर्लक्ष होते किंवा केले जाते आणि वणवा पेटतो.

त्याव्यतिरिक्त मोठे आणि खरे कारण आहे ते मानवाने जंगलात लावलेल्या आगीमुळे वणवा पेटणे. वणवा विझल्यानंतर वाळलेल्या झाडांचे लाकूड विकून मोठा पैसा कमावणे हे त्यातील प्रमुख कारण. वणव्यानंतर जंगलमुक्त होणाऱ्या जमिनीवर अनेकांचा डोळा असतो. जंगलातील आदिवासी दरवर्षी आपली जमीन बदलतात. त्यासाठी जमीन भाजताना आग नियंत्रणाबाहेर जाऊनही वणवा पेटतो. सन २०१६च्या वणव्यात एकट्या उत्तराखंडातील ८६०० एकर परिसरातील जंगल नष्ट झाले. मानव हा मानवनिर्मित वणव्याच्या आगीतून आपला स्वार्थ साधत असतो. जंगलात फिरणारी मंडळी, गुराखी बिडी, सिगारेट, आगकाडी पेटलेल्या अवस्थेत तशीच फेकतात आणि वणवा पेटतो. मध गोळा करणारी मंडळी मध काढताना अनेकदा टेंभा पेटवितात आणि मध काढल्यावर तो न विझवता तसाच फेकून देतात. मोहफुले वेचताना पानांचा त्रास टाळण्यासाठी ती पेटवली जातात. जनावरे चारायच्या रानात गवत पेटवले तर नवीन वर्षात गवत चांगले येते असा गैरसमज असल्यानेही अनेक मंडळी आग लावतात. अनेकजण गंमत म्हणूनही आग लावतात, तर काही बदला घेण्याच्या भावनेने आगी लावतात. ती नियंत्रणाबाहेर गेली की तिचे वणव्यात रुपांतर होते. शिवाजी विद्यापीठात एक उच्चशिक्षित वयस्कर गृहस्थ अशी आग लावताना सापडले होते.

वणव्यामुळे होणारे नुकसान हे फार मोठे आहे. यामध्ये मोठ्या प्रमाणात झाडांचे नुकसान होते. हिरवी पानांची संख्या कमी झाल्याने ऑक्सिजन निर्मिती घटते. अनेक छोटे जीव यामध्ये होरपळून मरतात. त्यामुळे त्या भागातील जैवविविधता कमी होते. जनावरांना उपयुक्त असणारा चारा घटतो. आगीमुळे कार्बनडाय ऑक्साईडची जास्त निर्मिती होते, प्रदूषण वाढते. अनेक पक्ष्यांचे अधिवास नष्ट होतात. भारतात दरमाणसी असणारे झाडांचे प्रमाण मुळातच कमी आहे. त्यात अशा वणव्यांमुळे ते आणखी घटते. मानवनिर्मित वणव्यातून आपण आपले मोठे नुकसान करत आहोत. आपण आपल्या पायावर दगड मारून घेत आहोत. राधानगरी अभयारण्यातील वणव्यात सात एकरांतील जंगल जळाल्याची बातमी वाचली आणि हे वणवा पुराण आठवले, इतकेच!

(लेखक विज्ञान व तंत्रज्ञान विषयाचे अभ्यासक आणि शिवाजी विद्यापीठाचे उपकुलसचिव आहेत.)

साधारणत: मार्च महिन्यात लागणाऱ्या वणव्यांचे प्रमाण हे ४६ ते ६६ टक्के आहे. पुढे हे प्रमाण कमी होत जाते. सन २०१२ ते २०१६ या कालावधीत भारतात लागलेल्या वणव्यांची संख्या ही १,०२,५२७ इतकी होती. छोट्या-मोठ्या आगी वेगळ्या. त्यातील ७५३४ वणवे महाराष्ट्रात लागले होते. सन २००३ नंतर वणव्यांच्या प्रमाणात ४५ टक्के वाढ झाली आहे. अमेरिकेच्या कोलोरॅडो जंगलात सन २००३ मध्ये लागलेल्या ब्लॅक फॉरेस्ट वणव्यात अनेकांची घरेही जळून गेली आणि ही आग विझवण्यास काही वर्षे लागली. वाल्डो कॅनॉन वणव्यात १८००० हेक्टरवरील जंगल नष्ट झाले.

# फाउंड्री उद्योगाचे धडे

कोल्हापूर टाइम्स टीम

शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभाग व आग्रा येथील मिनिस्ट्री ऑफ मायक्रोस्मॉल मेडियम एंटरप्रायझेस यांच्यावतीने शिवाजी विद्यापीठात भरवण्यात आलेल्या उद्यम समागम या प्रदर्शनाच्यानिमित्ताने फाउंड्री उद्योगांचा मेळा भरला आहे. विद्यापीठ आवारातील लोककला केंद्रात भरवण्यात आलेल्या दोन दिवसांच्या प्रदर्शनाचे उदघाटन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते बुधवारी झाले. फाउंड्री उद्योगातील ६५ कंपन्या या प्रदर्शनात सहभागी होत आपल्या कंपनीच्या उत्पादनांची प्रात्यक्षिकासह माहिती देत असल्यामुळे विद्यार्थ्यांसाठी हा मोठा खजिना ठरत आहे.

प्रदर्शनाच्या निमित्ताने ट्रेड फेअर,नॅशनल सेमिनार व जागरूकता शिबिर घेण्यात येणार आहे.बाजारपेठेत नव्याने येणारे उपक्रम, तांत्रिक विकास झालेल्या क्षेत्रातील फाउंड्री सेक्टर, इंटरनेट, मार्केटिंग, जीइएम पोर्टल,सार्वजनीक खरेदी धोरण याबद्दल जागरूकता, माहिती व प्रचार करण्याच्यादृष्टीने प्रदर्शनाची मांडणी करण्यात आली आहे. ६५ युनिटनी उत्पादनसेवेची माहिती या प्रदर्शनात सादर केली असून २० उद्योजकांच्यावतीने सेवासुविधांचे प्रात्यक्षिक दाखवण्यात येत आहे. कोल्हापूर, आग्रा, मुंबई, पुणे येथील कंपन्या या प्रदर्शनात सहभागी झाल्या आहेत.



अमित गद्रे

शिवाजी विद्यापीठा भरवण्यात आलेल्या उद्यम समागम प्रदर्शनातील फाउंड्री उत्पादनांची माहिती समजून घेताना विद्यार्थी

## विद्यापीठातील तंत्रज्ञान विभागात प्रदर्शन

शिवाजी विद्यापीठातर्फे या प्रदर्शनात इन्क्यूबेशन सेंटरतर्फे सध्या संशोधन सुरू असलेल्या उत्पादनांची माहिती देणारा स्टॉल मांडला आहे. गुजरात येथील एका कंपनीने टाकाऊ कास्टिंगपासून बांधकामासाठी वापरता येतील अशी वीट तयार केली आहे. शासकीय तंत्रनिकेतनमधील सेंटर फॉर एक्सलन्स इन जेम्स अँड ज्वेलरी विभागातर्फे सोन्याचे दागिने डिझाइन व घडवण्याचे प्रात्यक्षिक दाखवण्यात येत आहे. शाहूपुरी येथील मॅकनेट इंडस्ट्रीच्यावतीने अडीच टन वजन उचलणारे यंत्र मांडले आहे. फाउंड्री इंडस्ट्रीतील कास्टिंगचा पुनर्वापर कसा करायचा याची माहिती देणारे स्टॉल लक्ष वेधून घेत आहेत. तसेच टाकाऊपासून टिकाऊ वस्तू कशा बनवायच्या, इंडस्ट्रीतील नव्या तंत्रज्ञानानुसार कोणत्या उत्पादनांना मागणी आहे याविषयी प्रदर्शनात मार्गदर्शन करण्यात येत आहे. नैसर्गिक हळदपूड करणारे मशीन, ऑइल मशीन यांचा स्टॉल आहे. कुलसचिव डॉ.विलास नांदवडेकर, डॉ. डी. आर. मोरे यांनी प्रदर्शनाला भेट दिली. तंत्रज्ञान विभागाचे संचालक डॉ. जयदीप बागी, डॉ. ए. के. साहू, डॉ. एस. बी. काळे, पी. आर. जोशी, प्रतीक पराशर यांनी संयोजन केले.

# शिवाजी विद्यापीठात ई-कन्टेंट कार्यशाळा

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण केंद्र व बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्त्रोत केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२९ ते ३० मार्चदरम्यान ई-कन्टेंट डेव्हलपमेंट कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. माहिती व तंत्रज्ञानाच्या बदलत्या परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी व डिजिटल एज्युकेशनच्या अनुषंगाने प्राध्यापकांच्या शैक्षणिक विकसनशीलतेसाठी ई-कन्टेंटची कार्यशाळा आयोजित करण्याबाबतचा मुख्य उद्देश आहे.

या कार्यशाळेचे उद्‌घाटन शिवाजी विद्यापीठ प्र-कुलगुरू प्रा. डॉ डी. टी. शिर्के करणार आहेत. या कार्यशाळेत पुणे येथील शैक्षणिक माध्यम विकसनस्त्रोत केंद्राचे तांत्रिक तज्ज्ञ श्रीकांत ठक्कार व विनोद कल्ली हे मार्गदर्शन करणार आहेत. या कार्यशाळेसाठी शिवाजी विद्यापीठाच्या अधिविभागातील सहा.प्राध्यापक दूरशिक्षण केंद्रातील सहयोगी प्राध्यापक, समन्वयक व सहा. प्राध्यापक आदी उपस्थित राहणार आहेत. या कार्यशाळेमध्ये ई-कन्टेंट विकासाचे टप्पे, निर्मिती, संहितालेखन, ई-कन्टेटसाठी पॉवरपॉईंटचा उपयोग या विषयावर मार्गदर्शन होणार असून संगीत अधिविभागातील स्टुडिओमध्ये याबाबतचे प्रात्याक्षिक घेण्यात येणार आहे. या कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी दूरशिक्षण केंद्राचे संचालक प्रा. डॉ. एम. ए. अनुसे, संचालक प्रा. डॉ. नमिता खोत, ई-कन्टेंट प्रोग्रॅमचे डॉ. एस.व्ही. थोरात, उपकुलसचिव डॉ. एन. जे. बनसोडे, कार्यशाळा समन्वयक प्रा. डॉ. आर. यु. संकपाळ प्रयत्नशील आहेत.

सकाळ

# ...आता 'फिंगर प्रिंट'द्वारे मतदान शक्य

## मल्लिकार्जुन भिसे याचे संशोधन; शिवाजी विद्यापीठात दाखविले प्रात्यक्षिक

**कोल्हापूर, ता. २८ :** मतदान करण्यासाठी मतदान ओळखपत्र व आधारकार्डची गरज लागली नाही तर..? हे ऐकून थोडं आश्चर्य नक्कीच वाटेल. शिवाजी विद्यापीठाच्या इलेक्ट्रॉनिक्स विभागातील मल्लिकार्जुन प्रभू भिसे या विद्यार्थ्याने प्रायोगिक तत्त्वावर केलेल्या 'फिंगर प्रिंट बेस्ट इलेक्ट्रॉनिक वोटिंग मशिन'वर केवळ 'फिंगर प्रिंट'ची ओळख दाखवून मतदान करण्याची क्लृप्ती शोधून काढण्यात आली आहे.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या इलेक्ट्रॉनिक्स अधिविभागातील प्रा. डॉ. एम. के. भानारकर यांच्याबरोबर मल्लिकार्जुन भिसे.**

इलेक्ट्रॉनिक्स अधिविभागातील प्रा. डॉ. एम. के. भांडारकर यांचा मल्लिकार्जुन हा विद्यार्थी. त्याने स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करत असताना देशाच्या लोकशाहीसंबंधी वाचले होते. राजकारण हा त्याच्या आवडीचा विषय. 'इलेक्ट्रॉनिक वोटिंग मशिन'वर काही घोटाळे होत असल्याचे त्याने वाचले होते. त्यामुळे इलेक्ट्रॉनिक्सचा विद्यार्थी या नात्याने एखादे उपकरण बनवले पाहिजे, असा विचार त्याने केला. गेल्या सहा महिन्यांपासून त्याचे काम सुरू होते.

त्याने प्रायोगिक तत्त्वावर केलेल्या मशिनवर मतदाराला मतदान केंद्रावर मतदान ओळखपत्र व आधार कार्ड आणण्याची गरज नाही. मतदाराच्या बोटावर शाई लावण्याचीही गरज नाही. मतदाराने केवळ फिंगर प्रिंट केल्यानंतर त्याचे नाव व पत्ता याबाबत अचूक माहिती मिळणार आहे. फिंगर प्रिंट 'ओके' झाल्यानंतर तो मतदानास पात्र असणार आहे. मतदान केल्यानंतर त्याने ज्या उमेदवाराला मतदान केले आहे, ते काही क्षणांसाठी त्याला पाहायला मिळणार आहे. बोटावरील शाई पुसून पुन्हा मतदान करणाऱ्या मतदारांना यामुळे चाप बसेल, असे तो म्हणतो. ईव्हीएम मशिनची किंमत साधारणपणे चौदा हजार रुपयांपर्यंत आहे. मात्र, आपण तयार केलेल्या मशिनची किंमत चार हजार रुपयांपर्यंत असेल.

**विज्ञान शाखेचा पदवीधर**

मल्लिकार्जुन हा मूळचा लातूरचा आहे. त्याने संत गोविंदबाबा विद्यालयातून दहावीला ८९, तर संजीवनी महाविद्यालयातून बारावीला ६४ टक्के गुण मिळविले. त्याने राजर्षी शाहू महाविद्यालयातून विज्ञान शाखेची पदवी घेतली आहे.

**वापर सहजशक्य**

आधार कार्ड तयार करताना प्रत्येकाचे फिंगर प्रिंट घेतले जाते. हा डेटा सेव्ह असल्याने त्याचा निवडणुकीत मतदान केंद्रावर वापर करता येऊ शकतो. त्याद्वारे मतदाराची ओळख पटणे सोपे जाते, असे मल्लिकार्जुन सांगतो.

लोकमत

# उत्तरपत्रिका तपासणीची परीक्षा मंडळांची कसरत

## शिवाजी विद्यापीठ : वेळेत निकालाचे आव्हान

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षांच्या उत्तरपत्रिका तपासणी पूर्ण करताना शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाला कसरत करावी लागणार आहे. विद्यापीठ संलग्नित विविध महाविद्यालयांतील सुमारे २०० प्राध्यापकांची लोकसभा निवडणुकीच्या कामासाठी नियुक्ती झाल्याने उत्तरपत्रिकांची तपासणी वेळेत पूर्ण करताना परीक्षा मंडळाची दमछाक होणार आहे.

गेल्या तीन दिवसांपासून विद्यापीठातर्फे उन्हाळी सत्रातील परीक्षा सुरु झाल्या आहेत. त्यातच लोकसभा निवडणुकीचे काम सुरु आहे. या कामासाठी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील विविध ३० महाविद्यालयांतील २०० प्राध्यापकांची नियुक्ती झाली आहे. त्यामध्ये उत्तरपत्रिका तपासणीचे काम करणाऱ्या बहुतांश प्राध्यापकांचा समावेश आहे. विद्यापीठाच्या नियमानुसार परीक्षांचा निकाल ३० ते ४५ दिवसांत लावणे आवश्यक आहे.

### जिल्हा प्रशासनाला विनंती करणार

- विद्यापीठ कार्यक्षेत्रातील २०० हून अधिक प्राध्यापकांची निवडणुकीच्या कामासाठी नियुक्ती झाली आहे. सध्या परीक्षांच्या उत्तरपत्रिका तपासणीच्या कामासाठी पुरेसे प्राध्यापक उपलब्ध झाले नाहीत, त्याचा परिणाम निश्चितपणे होणार आहे.
- त्यामुळे वेळ पडल्यास प्राध्यापकांच्या उपलब्धतेबाबत विद्यापीठ प्रशासनाकडून कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्हा प्रशासनाला विनंती करणार असल्याचे प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनी सांगितले.

# दर्जेदार समीक्षाग्रंथाला पुरस्कार

कोल्हापूर टाइम्स टीम

ख्यातनाम समीक्षक व ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ प्राचार्य डॉ. म. सु. पाटील यांचे कुटुंबीय व शिवाजी विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने दर दोन वर्षांनी 'डॉ. म. सु. पाटील पुरस्कार' दिला जाणार आहे. पुरस्कारासाठी पाटील कुटुंबीयांतर्फे पाच लाख रुपये शिवाजी विद्यापीठाकडे सुपूर्द करण्यात आले. या देणगीच्या व्याजातून त्यांच्या नावाने मराठीतील दर्जेदार समीक्षाग्रंथास हा पुरस्कार देण्यात येणार आहे.

म. सु. पाटील हे मराठीतील नामवंत समीक्षक असून मनमाड महाविद्यालयात प्राचार्य म्हणून काम केले आहे. त्यांचे आजवर दहाहून अधिक ग्रंथ प्रसिद्ध आहेत. मराठी समीक्षा लेखन परंपरेत त्यांची समीक्षा मूलभूत स्वरुपाची आहे. त्यांच्या ग्रंथांना साहित्य अकादमीच्या पुरस्कारासह अनेक पुरस्कारांनी गौरविले आहे. त्यांच्यानावे समीक्षा तसेच वैचारिक क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. पाटील कुटुंबीयापैकी कवयित्री नीरजा, शंकर अय्यर, तृप्ती शंकर, अनुराधा मोकल यांच्या उपस्थितीत प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव विलास नांदवडेकर यांच्याकडे निधी दिला. याप्रसंगी साहित्यिक डॉ. राजन गवस, समीक्षक डॉ. रणधीर शिंदे, वित्त व लेखाअधिकारी व्ही. टी. पाटील, प्राचार्य धनाजी कणसे, डॉ. व्ही. एन. शिंदे आदी उपस्थित होते.



समीक्षक म. सु. पाटील कुटुंबीयातर्फे विद्यापीठास पाच लाखाचा धनोदश सुपूर्द करताना कवयित्री नीरजा, शंकर अय्यर, तृप्ती शंकर, अनुराधा मोकल, कुलसचिव विलास नांदवडेकर, डॉ. राजन गवस, व्ही. एन. शिंदे, डॉ. रणधीर शिंदे, व्ही. टी. पाटील आदी.

**समीक्षक म. सु. पाटील कुटुंबीयांतर्फे पाच लाखांची देणगी**

# चुका असलेले प्रमाणपत्र जमा करण्याचे आवाहन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

ज्या पदवी प्रमाणपत्रात चुका झाल्या आहेत, अशी प्रमापणत्रे विद्यार्थ्यांनी दीक्षांत विभागात आणून जमा करावीत, असे आवाहन प्र कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

पदवी प्रमाणपत्रातील घोळाचा विद्यार्थ्यांना मन:स्ताप सहन करावा लागत आहे. अनेक विद्यार्थी संघटनांनी याचा निषेध केला. दरम्यान, डॉ. शिर्के यांनी विद्यार्थ्यांकडे चुका झालेली पदवी प्रमाणपत्रे जमा करण्याच्या सूचना दिल्या आहेत. तसेच या चुका कशामुळे झाल्या याची माहिती घेण्याचे काम सुरू असल्याचे सांगितले.

# विद्यापीठातर्फे आज खेळाडूंचा गुणगौरव

कोल्हापूर : सन २०१७-१८ यावर्षी अखिल भारतीय आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धेत प्राविण्य मिळविलेल्या खेळाडूंचा गुणगौरव समारंभ शिवाजी विद्यापीठात आज, शुक्रवारी सकाळी साडेअकरा वाजता होणार आहे. क्रीडा अधिविभागातर्फे आयोजित या कार्यक्रमास आंतरराष्ट्रीय नेमबाजपटू गिरीजा पाटील-देसाई प्रमुख उपस्थित असणार आहेत.

# विद्यापीठात आजपासून 'ई-कन्टेंट'वर कार्यशाळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण केंद्र व बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्रातर्फे ई-कन्टेंट डेव्हलपमेंट कार्यशाळा आज, शुक्रवारी आणि उद्या, शनिवारी दूरशिक्षण केंद्रात होणार आहे. कार्यशाळेचे उद्घाटन प्र-कुलगुरु प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते होईल. त्यामध्ये पुणे येथील शैक्षणिक माध्यम विकसनस्रोत केंद्राचे तांत्रिक तज्ज्ञ श्रीकांत ठक्कार, विनोद कल्ली हे मार्गदर्शन करणार आहेत.